# कोविड-19मध्ये आयव्हर्मेक्टिनसाठी वैद्यकीय चाचण्यांच्या दाखल्याचा एक पानी सारांश

आयव्हर्मेक्टिनला एक परजीवी प्रतिरोधक औषध म्हणून त्याच्या शोधासाठी 2015मध्ये नोबल पुरस्कार मिळाला होता. या औषधाने प्रयोगशालेय अभ्यासांमध्ये उच्च क्षमता असलेले, विषाणू-प्रतिरोधक आणि दाह-प्रतिरोधक क्षमता सिध्द केल्या आहेत. गेल्या 4 महिन्यांमध्ये, विविध केंद्रांमध्ये व जगभरातल्या देशांमध्ये घेतल्या गेलेल्या अनेक नियंत्रित वैद्यकीय चाचण्यांमध्ये आयव्हर्मेक्टिनचा उपचार दिल्यावर कोविड-19 च्या रुग्णांमध्ये निरंतर, मोठ्या प्रमाणामध्ये सुधारणा झालेल्या आढळल्या आहेत. या संदर्भातल्या चाचण्यांवरची आमची विस्तिर्ण शास्त्रीय पुनरावलोकने ओपन सायन्स फाउंडेशन प्रि-प्रिंट सर्वर इथे आढळतील: https://osf.io/wx3zn/

## आयव्हर्मेक्टिनचे गुणविशेष

1) आयव्हर्मेक्टिन SARS-CoV-2, इन्फ्युएंझा आणि इतर अनेक विषाणूंच्या पुनरावृत्तीला प्रतिरोध करते;
2) आयव्हर्मेक्टिनमध्ये प्रतिरोधाच्या अनेक यंत्रणांसह सक्षम दाह-प्रतिरोधक गुण आहेत;
3) आयव्हर्मेक्टिन विषाणूचा भार कमी करुन प्राणीज मॉडेलमध्ये अवयवांना इजा होण्यापासून रक्षण करते;
4) आयव्हर्मेक्टिन संपर्काआधी किंवा नंतर घेतल्यास कोविड-19 चे संक्रमण टाळते;
5) आयव्हर्मेक्टिन कोविड-19 च्या रुग्णांना जलद गतीने बरे करते, हॉस्पिटलमध्ये राहण्याचा काळ आणि रुग्णांचा मृत्यू कमी करते.
6) आयव्हर्मेक्टिन मोठ्याप्रमाणात वापर असलेल्या प्रदेशांमध्ये दगावण्याचे दर कमी करते.

## कोविड-19मध्ये आयव्हर्मेक्टिनच्या सक्षमतेचे समर्थन करणारे दाखल्यांचे आधार (11जानेवारी, 2021 पर्यंत)

(RCT's = अक्रमागत नियंत्रित चाचण्या, OCT's = निरीक्षणात्मक नियंत्रित चाचण्या). प्रत्येक वैद्यकीय चाचणीने लाभ दाखवले असून RCT's आणि OCT's अहवालात तेच निर्देश व परिमाण आहे; जवळपास सर्व सांख्यिकीदृष्ट्या उत्तम आहेत.

**कोविड-19 टाळण्याचा अभ्यास करणा-या नियंत्रित चाचण्या (8 चाचण्या पूर्ण झाल्या आहेत)**

- 3 RCT's मध्ये प्रसार दरात सांख्यिकीदृष्ट्या मोठ्याप्रमाणात घट आढळली असून एकूण 774 रुग्ण होते
- 5 OCT's मध्ये प्रसार दरात सांख्यिकीदृष्ट्या मोठ्याप्रमाणात घट आढळली असून एकूण 1,688 रुग्ण होते

**कोविड-19 च्या सुरुवातीच्या आणि हॉस्पिटलमध्ये भरती झाल्यावरच्या उपचारांच्या नियंत्रित चाचण्या (19 चाचण्या पूर्ण झाल्या आहेत)**

- 5 RCT's मध्ये बरे होण्याच्या /हॉस्पिटलमध्ये वास्तव्याच्या कालावधीत लक्षणीयरित्या मोठ्या प्रमाणात घट आढळली असून एकूण 774 रुग्ण होते
- 1 RCT's मध्ये क्षती/हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात लक्षणीयरित्या मोठ्या प्रमाणात घट आढळली असून एकूण 363 रुग्ण होते
- 2 RCT's मध्ये वायरल भार, वास न येणे, खोकला किंवा बरे होण्याच्या कालावधीच्या दिवसांमध्ये लक्षणीय घट आढळली असून एकूण 85 रुग्ण होते
- 3 RCT's मध्ये मृत्यूंमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये लक्षणीयरित्या घट आली असून एकूण 695 रुग्ण होते
- 3 RCT's मध्ये मृत्यूंमध्ये सांख्यिकीदृष्ट्या मोठ्या प्रमाणामध्ये लक्षणीयरित्या घट आली असून एकूण 1688 रुग्ण होते

**कोविड-19मध्ये आयव्हर्मेक्टिनच्या वर्तमान वैद्यकीय चाचण्यांमधल्या अभ्यास आणि रुग्णांची संख्या**

- 27 नियंत्रित चाचण्या, ज्यात एकूण 6612 रुग्णांनी सहभाग घेऊन वेल-मॅच्ड कंट्रोल ग्रुप्सचा वापर करुन पूर्तता केली आहे.
- 2500हून जास्त रुग्णांनी सहभाग घेतलेल्या 16 चाचण्या अपेक्षित, अक्रमागत, नियंत्रीत अभ्यास आहेत
- 27 पैकी 11 चाचण्या पिअर-रिव्ह्यूड जर्नल्समध्ये प्रकाशित झाल्यासून त्यात 3900 रुग्ण होते, उर्वरीतांचे प्रिंट होणे बाकी आहे.

## फ्रंट लाइन कोविड-19 क्रिटिकल केअर एलियान्स-कोविड-19मध्ये आयव्हर्मेक्टिनची शिफारस

जरी विश्लेषणाला केवळ 16 अक्रमागत नियंत्रित चाचण्यांवर मर्यादित केले (एकूण 2500हून जास्त रुग्ण समाविष्ट होते), तरी बहुतांश चाचण्यांमध्ये आजाराचे संक्रमण किंवा आजाराची प्रगती किंवा दगावण्यामध्ये सांख्यिकीदृष्ट्या लक्षणीय घट दिसून आली आहे. पुढे एका स्वतंत्र संशोधन कंन्सोर्टिअमने केलेल्या नजीकच्या काळातल्या मेटा-विश्लेषणात कोविड-19मध्ये आयव्हर्मेक्टिन निष्प्रभावी ठरण्याची संभावना 67 दशलक्षांमध्ये 1 गणण्यात आली आहे.[1]

एफएलसीसीसी एलियान्स, एकूण वर्तमान दाखल्यांवर आधारलेले असून, प्रोफिलेक्सिस आणि कोविड-19च्या सर्व टप्प्यांसाठी आयव्हर्मेक्टिनच्या वापरासाठी A-I शिफारशीचे (एनआयएच(NIH) रेटिंग स्किम, सबळ पातळी, उच्च दर्जाचा दाखला) समर्थन करते.

पुढे, आम्ही सर्व नियामक एजन्सींना उपरोक्त अभ्यासांना विस्तारीत स्वरुपात दिलेल्या आमच्या दस्तऐवजांचे त्याचप्रमाणे अनेक शहरे व प्रदेशांमध्ये आयव्हर्मेक्टिन वितरण कार्यक्रमांच्या प्रारंभानंतर उदभवलेल्या अनेक लोकसंख्या-व्यापी "नैसर्गिक प्रयोगांचे" पुनरावलोकन करण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत.[2] आयव्हर्मेक्टिनच्या व्यापक वापरामुळे केसेस व मृत्यूदरामध्ये लक्षणीय घट आढळली असून ती या भागांमध्ये महामारीपूर्वी असलेल्या पातळ्यांपर्यंत आली आहे. या भागात उद्भवलेल्या गोष्टींच्या अनुभवाने, आयव्हर्मेक्टिन महामारीवर नियंत्रण मिळवण्यातला महत्वपूर्ण व जालिम उपचार घटक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

[1] ivmmeta.com
[2] Kory P, Meduri GU, Iglesias J, Varon J et al. 2020. Review of the Emerging Evidence Demonstrating the Efficacy of Ivermectin in the Prophylaxis and Treatment of COVID-19. *Open Science Foundation.* https://osf.io/wx3zn/